

# मी मधमाशी बोलतेय...

डॉ. प्रमोद मगर
कीटकशास्त्रज्ञ,
कृषी विज्ञान केंद्र,
यवतमाळ

हो, मीच ती मधमाशी पण मी कामकरी, बरं का...
काय रे माणसा, किती संकुचित केलं नाव माझं...
माझं महत्त्व, आयुष्य केवळ मधापुरतं,
इतकंच आहे का?
आयुष्य सरतं पटकन्,
पण काम सरत नाही माझं..

माझं बालपण तेवढं आरामात जातं, पण एकदा प्रौढ झाले की, फक्त नशिबाला कामच पुजलेलं असतं,

वसाहतीची सफाई करते, लहान-मोठ्या अळ्यांना खाऊ घालते, 'वांझ' आहे बरं मी... तरी 'माय'चं मातृत्व मोठ्या मनानं स्वीकारते, राणीच्या लेकरांना मीच सांभाळते...

अरे, एवढंच काय, त्या राणीलाही मीच सांभाळते...

मी मकरंद-पराग गोळा करते
एवढीच माझी ओळख तुम्हाला,
पण लाखमोलाचं परागीभवनही मीच करते...
ही सृष्टी माझ्यामुळेच फुलते...
ते दिसतं का रे कधी तुम्हाला?

मी रोंगण आणते, वसाहतीची डागडुजी करते...
त्या ईश्वराची 'देण'
जे नाही बनत कारखान्यात कुठं,
ते मीच तयार करते 'मेण'...
भल्याभल्यांना जमत नाही



अशी षटकोनी घरं मी अगदी सहज बांधते...
राणीचं राणीपण मीच अबाधित ठेवते...

ती नसली की मीच हिंमतीने राणीघर सांभाळते, वसाहतीसाठी नवीन राणी देते...

तुम्ही किती रे राग करता माझा,
किती भिता मला...
इच्छा नसतानाही डंख मारायला
भाग पाडता मला...
मी कर्तव्याच्या ओझ्याखाली मजबूर असते..
ठेवून मनावर दगड तुम्हाला वेदनादायक डंख करते..

डंख शिरतो तुमच्याच शरीरात, पण एक सांगू, तो माझा अंत असतो!

हे माझं मरणही, मी अगदी स्वाभिमानानं स्वीकारते, डंख देऊन, तुमचा कोलेस्टेरॉल, संधिवाताचा त्रास दूर करते, मी मरते अन् माझं विषही अमृतासम तुमची मदत करते...

अशी मी तुमची कामकरी...
हो फक्त कामकरी..

शेवटी हात जोडून एक मागू का? मधासाठी माझं कुटुंब उद्ध्वस्त करू नका,

मला पोरकं नका करू...
आणि झालीच आपली भेट कधी,
तर मला कामकरी जरुर म्हणा,
पण फक्त मधापुरती ओळख नका रे देऊ मला!






